**साक्षीदार क्र. ५**

**मी याव्दारे प्रतिज्ञेपुर्वक निवेदन करतो की,**

**नाव : सहाय्यक फौजदार मच्छिंद्र रामभाउ अडकित्ते,**

**वय : ५२ वर्ष, धंदा: नोकरी ,**

**रा. अहमदनगर, ता. अहमदनगर, जि. अहमदनगर**

**साक्षीदाराचा सरतपास सरकारी विधिज्ञ श्री. आर. के. शिंदे यांचेमार्फत सुरू :**

दि. २७.०६.२०२५ रोजी माझी नेमणुक सोनई पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ या पदावर होती. त्यादिवशी गु.र.नं. २७७/२०२४ चा तपास माझ्याकडे भा.द.वि कलम २७९, ३३७, ४२७ प्रमाणे आला होता. सदरचा तपास पोलीस ठाणेअंमलदार श्री. डी.एम.गावडे यांच्या आदेशाने माझ्याकडे आला. आता मला सदर आदेश दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर श्री.डी.एम.गावडे यांची सही आहे. ती मी ओळखतो कारण ते माझे सहकारी आहेत. सबब सदरील आदेशास **नि. ३४** देण्यात येते. त्यानंतर मी दुस-या दिवशी दोन पंचा समक्षघ टनास्थळाचा पंचनामा केला. सदरचे घटनास्थळ हे सोनई घोडेगाव रोड शनिशिंगणापुर कडे जाणारा अरूंद पुलाजवळ होते. आता मला सदर घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचाची यांची सही आहे. तो सदरील घ टनास्थळ पंचनामा नि.२४ वर आहे. सदरचा घटनास्थळ पंचनामा मी पंचासमक्ष केला व लिहीला. त्यानंतर मी घटनास्थळाचे फोटो काढले व साक्षीदारांचा जबाब नोंदविला. त्यानंतर मी सोनई पेट्रोलपंपाजवळ अपघातग्रस्त दोन्ही वाहनांचा दोन पंचासमक्ष पंचनामा केला. आता मला सदर अपघ ातग्रस्त वाहनांचे दोन्ही पंचनामे दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व दोन पंचाची सही आहे. त्यापैकी वाहन क्र. एम.एच.१६ बी.डी. ६१८३ या वाहनाचा पंचनामा नि.२५ वर आहे व वाहन क्र. एम.एच. १७ बी.डी. ८१८१ या **वाहनाच्या पंचनाम्यास नि. ३५** देण्यात येते. त्यानंतर मी वाहनांचे फोटो काढले व साक्षीदारांचे जबाब नोंदविले. त्यानंतर मला जखमीचा पुरवणी जबाब प्राप्त झाला. त्यानंतर मी जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र व तसेच वाहनांची कागदपत्रे हस्तगत केली. त्यानंतर मी दोन्ही वाहनांची तांत्रिक तपासणी करून त्यांचा अहवाल दोषरोपपत्रात सामील केला. सदर दोन्ही वाहनांचे तांत्रिक तपासणी अहवाल आरोपीच्या विधीज्ञांनी मान्य केल्यामुळे त्यास नि. २६ व २७ देण्यात आली. त्यानंतर मी आरोपीला फौ.प्र.सं. कलम ४१ (१) प्रमाणे नोटीस दिली. आता मला सदरील नोटीस दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सबब फौ.प्र.सं. कलम ४१ (१) च्या

**नोटीसीस नि. ३६** देण्यात येते. त्यानंतर मी आरोपीला मो.वा.का.कलम २०९ प्रमाणे नोटीस दिली. आता मला सदरील नोटीस दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सबब मो.वा.का.कलम २०९ च्या नोटीसीस **नि.३७** देण्यात येते. त्यानंतर मी सदरील दोन्ही वाहने मॅनेजर बाळासाहेब आढाव राहुरी तालुका दुध संघ व सोपान आव्हाड संगमनेर तालुका दुध संघ यांच्या ताब्यात दिली. आता मला सदरील दोन्ही बंधपत्र दाखविण्यात आले. ते तेच असुन त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी व आरोपीची सही आहे. सबब दोन्ही बंधपत्रास अनुक्रमे **नि. ३८ व ३९** देण्यात येते. त्यानंतर मला एम.एल.सी प्राप्त झाली. ती नि.२८ वर असुन आरोपीच्या विधीज्ञांनी मान्य केली आहे. जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र आरोपीच्या विधीज्ञांनी मान्य केल्यामुळे ते नि. २९ व ३० वर आहे. त्यानंतर माझ्या तपासात असे निष्पन्न झाले की, प्रस्तुतचा गुन्हा आरोपीने भा.द.वि कलम २७९, ३३७, ३३८, ४२७, मो.वा.का. कलम १८४ व १७७ प्रमाणे केला असुन आरोपीने त्याचे ताब्यातील ट्रक क्र. एम.एच. १७ बी.डी. ८१८१ अविचाराने हयगयीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्षकरून चालवुन सोनई ते घोडेगाव जाणारे अरुंद पुलाजवळ समोरून येणारे सहा टायर ट्रक एम.एच. १७ बी.डी ६१८३ हीच जोराची धडक देवुन फिर्यादी व जखमीचे कमी व अधिक दुखापतीस कारणीभुत झाला व फिर्यादी व आरोपीला वैद्यकीय माहिती न देता, तेथुन निघुन गेलात. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर नाही. आरोपीला पाहिल्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पुर्ण,**

**आरोपीतर्फे विधिज्ञ ॲड. श्री. ए.टी.आगळे यांचे मार्फत सुरु-**

हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनामा व अपघातग्रस्त वाहनांचा पंचनामा करीत असतांना पंच तेथे हजर नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, दोन्ही पंच पोलीस ठाण्यात हजर होते व मी दोन्ही पंचाच्या पोलीस ठाण्यात सहया घेतले. हे म्हणणे खरे नाही की, मी साक्षीदारांचा जबाब त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीचा तपास करून चुकीचे दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण,**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

PRANITA RITESH SUGAONKAR
Digitally signed by PRANITA RITESH SUGAONKAR
Date: 2026.02.26 17:57:33 +0530

दिनांक :- २६/०२/२०२६

(डॉ. पी. आर. सुगांवकर)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, नेवासा.